| | |
|---|---|
| **MHBI140017952019** | दाखल दिनांक : १९ / ०९ / २०१९<br>नोंदणी दिनांक : १९ / ०९ / २०१९<br>निकाल दिनांक : १० / ०४ / २०२६<br>कालावधी : व. ०६ म. ०६ दिवस २१ |

**भाग 'अ'**

**विद्यमान न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग (कोर्ट नं.१), आष्टी, तह. आष्टी व जि. बीड यांचे न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी : के.के.खामणे)**

**नियमित फौजदारी खटला क्र.१७४/२०१९ निशाणी क्र.३५.**

प्रथम खबर अहवाल तपशील
गुन्हा नोंद क्र. : १९४/२०१८
पोलीस ठाणे : अंभोरा, ता.आष्टी, जि.बीड.

| | | |
|---|---|---|
| **अभियोग पक्ष** | | **महाराष्ट्र शासन,**<br>मार्फत पोलीस ठाणे अंभोरा,<br>ता.आष्टी, जि.बीड. |
| सरकारी अभियोक्ता | | **श्रीमती ए.के.अंगारखे** |
| **आरोपी** | १) | **प्रकाश शंकर घुले,**<br>वय : २२ वर्षे, धंदा : –, |
| | २) | **पारुबाई शंकर घुले,**<br>वय : ४० वर्षे, धंदा : –, |
| | ३) | **धर्मनाथ प्रभाकर शिरसाट,**<br>वय : २० वर्षे, धंदा : –,<br>रा.अरणविहीरा, ता.आष्टी, जि.बीड. |
| | ४) | **विकास शंकर घुले,**<br>वय : २० वर्षे, धंदा : –,<br>आरोपी क्र. १,२ व ४ रा.कारखेल, ता.आष्टी, जि.बीड. |

## भाग 'ब'

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | ०१/१०/२०१८ |
| प्रथम खबर अहवाल | ०१/१०/२०१८ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | १८/०९/२०१९ |
| दोषारोप निश्चीती दिनांक | ०५/१२/२०२३ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | ०८/०४/२०२६ |
| निकाल राखुन ठेवल्याचा दिनांक | --- |
| न्यायनिर्णय दिनांक | १०/०४/२०२६ |
| शिक्षा सुनावल्याचा कालावधी लागु असल्यास | --- |

## आरोपींचा तपशील

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामीन वर मुक्त झाल्याचा दिनांक | दोषारोपाचे कलम | आरोपीस शिक्षा किंवा निर्दोष मुक्त केले. | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ प्रमाणे कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | प्रकाश शंकर घुले | - | - | भा.दं.वि. कलम ३५४, ४५२, ३२३, ४२७, ५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये | निर्दोष मुक्त केले. | -- | -- |
| २) | पारुबाई शंकर घुले | - | - | भा.दं.वि. कलम ३५४, ४५२, ३२३, ४२७, ५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये | निर्दोष मुक्त केले. | -- | -- |
| ३) | धर्मनाथ प्रभाकर शिरसाट | - | - | भा.दं.वि. कलम ३५४, ४५२, ३२३, ४२७, ५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये | निर्दोष मुक्त केले. | -- | -- |
| ४) | विकास शंकर घुले | - | - | भा.दं.वि. कलम ३५४, ४५२, ३२३, ४२७, ५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये | निर्दोष मुक्त केले. | -- | -- |

## भाग 'क'

## अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार

| अ.सा.क्र. | साक्षीदारांची नांवे | निशाणी क्र. | साक्षी प्रकार |
|---|---|---|---|
| १ | शोभा प्रल्हाद चौधर | २८ | फिर्यादी |
| २ | अक्षय प्रल्हाद चौधर | २९ | साक्षीदार |

**आरोपीतर्फे साक्षीदार**

| अ.सा. | साक्षीदारांची नांवे | साक्षी प्रकार |
|---|---|---|
| – | – | – |

**न्यायालयामार्फत तपासण्यात आलेले साक्षीदार**

| अ.सा. | साक्षीदारांची नांवे | साक्षी प्रकार |
|---|---|---|
| – | – | – |

**अभियोग पक्षातर्फे देण्यात आलेल्या निशाणी**

| अ.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|
| – | – | – |

**आरोपींनी मान्य केलेली कागदपत्रे**

| अ.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|
| १ | ३३ | घटनास्थळ पंचनामा |
| २ | ३४ | जप्ती पंचनामा |

**आरोपीतर्फे देण्यात आलेल्या निशाणी**

| अ.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|
| – | – | – |

**न्यायालयातर्फे देण्यात आलेले निशाणी**

| अ.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|
| – | – | – |

**मुद्देमालाचा तपशील**

| अ.क्र. | मुद्देमाल क्रमांक | मुद्देमालाचा प्रकार |
|---|---|---|
| – | – | – |

## <u>न्यायनिर्णय</u>

## (दिनांक १०/०४/२०२६)

अभियोग पक्षाने आरोपी क्र.१ ते ४ यांचे विरुध्द शिक्षाधीन कलम ३५४, ४५२, ३२३, ४२७, ५०४ व ५०६ सह कलम ३४ भा.दं.सं. अन्वये खटला दाखल केला आहे.

**<u>अभियोग पक्षाचे कथन खालीलप्रमाणे–</u>**

**२.** खटल्याची थोडक्यात पार्श्वभुमी अशी की, फिर्यादी शोभा प्रल्हाद चौधर हिने फिर्याद दिली की, दि.२९/०९/२०१८ रोजी दुपारी १२.०० ते १२.३० वाजण्याच्या सुमारास त्या पाणी घेण्यासाठी गेल्या असता त्यांच्या दुकानासमोर शंकर विठोबा घुले याने फिर्यादीच्या टपरी समोर येवुन अर्वाच्च भाषेत फिर्यादीच्या मुलाला शिवीगाळ केली. दि. ०१/१०/२०१८ रोजी सकाळी ८.०० वाजण्याच्या दरम्यान फिर्यादीच्या राहत्या घरी आरोपी क्र. १ ते ४ आले व आरोपी क्र. १ याने फिर्यादीच्या हातास वाईट हेतुने धरुन ओढले त्यावेळी फिर्यादीचा मुलगा व मुलगी यांनी सोडवा सोडव करण्यासाठी आले असता आरोपी क्र. १ ते ४ यांनी तिघांना लाथा बुक्यांनी तसेच लोखंडी पाईपने मारहाण करुन शिवीगाळ केली. तसेच धमकी दिली. त्यामुळे फिर्यादीने आरोपीं विरुध्द पोलीस स्टेशन अंभोरा येथे तक्रार दाखल केली.

**३.** सदर तक्रारीवरुन आरोपीविरुध्द अप.क्र.१९४/२०१८ प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला. तपासी अधिकारी श्री.डी.बी. कुकलारे, सहाय्यक पोलीस निरीक्षक यांनी प्रस्तुत गुन्हयाचे तपासकामी घटनास्थळ, जप्ती पंचनामा तयार केला व साक्षीदारांचे जबाब नोंदविले. तपासाअंती तपासी अधिकारी यांनी आरोपींविरुध्द दोषारोपपत्र न्यायालयात सादर केले.

**४.** आरोपी क्र.१ ते ४ विरुध्द नि.क्र.१७ वर दोषारोप नोंदविण्यात आले. ते त्यांना मराठी भाषेत समजावून सांगितले असता त्यांनी गुन्हा मान्य नसल्याचे सांगितले व संपरिक्षा घेण्याची मागणी केली.

**५.** अभियोग पक्षातर्फे दोन साक्षीदार तपासाण्यात आले. फिर्यादी हिने तिच्या विधीज्ञांमार्फत नि.क्र. ३२ वर पुरावा बंद पुरसीस दाखल केली. आरोपीं विरुध्द कोणताही पुरावा अभिलेखावर नसल्याने त्यांचे फौजदारी प्रक्रिया संहीता कलम ३१३ अन्वये निवेदन वगळण्यात आले.

**६.** अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता आणि आरोपींतर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. माझ्या विचाराधीन असलेल्या मुद्दयांवर मी माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे कारणांसह देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की, दि.०१/१०/२०१८ रोजी सकाळी ८.३० वाजण्याचे सुमारसे मौजे कारखेल ता. आष्टी, जि.बीड येथे फिर्यादीच्या राहत्या घरी आरोपींनी समान उद्देशाच्या पुरस्सरनार्थ आरोपी क्र. ३ याने वाईट हेतुने फिर्यादीचा हात धरुन तिला ओढले व तिच्या मनाला लज्ञा उत्पन्न होईलन असे कृत्य करुन तिचा विनयभंग केला आणि त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड संहितेचे कलम ३५४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | नाही. |
| २. | अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की, कालावधी दरम्यान व ठिकाणी आरोपींनी समान उद्देशाच्या पुरस्सरनार्थ अनाधिकाराने तिच्या घरात प्रवेश करुन गृह अतिक्रमण केले आणि त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड संहितेचे कलम ४५२ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | नाही. |
| ३ | अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की, कालावधी | |

| | | |
|---|---|---|
| | दरम्यान व ठिकाणी आरोपींनी समाना हेतुने घरातील सामानाची नासधुस करुन तिचे नुकसान केले आणि त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड संहितेचे कलम ४२७ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | |
| ४. | अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की, वरील तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी समान उद्देशाने फिर्यादीस व तिची मुले यांना लाथाबुक्क्याने मारहाण करुन ईच्छापुर्वक दुखापत केली आणि त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड संहितेचे कलम ३२३ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | नाही. |
| ५. | अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की, वरील तारीख, वेळी व ठिकाणी समान उद्देशाने फिर्यादी व साक्षीदारास शिवीगाळ करुन तिला सार्वजनीक शांततेचा भंग करावा किंवा अन्य अपराध करावा या उद्देशाने तिचा अपमान केला आणि त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड संहितेचे कलम ५०४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | नाही. |
| ६. | अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की, वरील तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी समान उद्देशाने फिर्यादीस व साक्षीदारास जिवे ठार मारण्याची धमकी दिली आणि त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड संहितेचे कलम ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | नाही. |
| ७. | आदेश काय ? | आरोपी क्र.१ ते ४ यांना निर्दोष मुक्त करण्यात येते. |

:: **का र ण मि मां सा** ::

**७.** अभियोगपक्षाने आरोपींच्या विरुध्द दोषारोप सिध्द करण्याकरीता केवळ एक साक्षीदार तपासला. अभियोग पक्षाने नि.क्र.२७ वर दाखल केलेल्या पुरसीस नुसार त्यांनी पुरावा बंद केला. आरोपींनी घटनास्थळ पंचनामा (नि.क्र.३३) आणि जप्ती पंचनामा (नि.क्र.३४) हे कागदपत्र मान्य केले आहेत.

**<u>मुद्दे क्र.१ ते ६ करीता</u>** :

**८.** वरील सर्व मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्याने त्यावरील कारणमिमांसा आणि पुरावा पुन्हा विवेचीत करण्यापेक्षा त्यावरील कारणे मी एकत्रीत नोंदवित आहे.

**९.** सा.क्र.१ शोभा प्रल्हाद चौधर ही सदर प्रकरणातील फिर्यादी असून ती कथन करते की, ती सर्व आरोपींना ओळखते ते तिचे शेजारी राहतात. त्यांचा आरोपीं समवेत वाद झाला होता. तसेच, तिने तिच्या तोंडी पुराव्यात आरोपी क्र.१ ते ४ यांचे विरुध्द काहीही कथन केले नाही.

**१०.** सा.क्र.२ अक्षय प्रल्हाद चौधर याने कथन केले की, फिर्यादी त्याची आई असुन तो आरोपींना ओळखतो कारण आरोपी त्याच्या गावातील रहिवासी आहेत. त्यांचा आरोपीं समवेत वाद झाला होता. याव्यतिरिक्त काही घडले नाही. फिर्यादी व साक्षीदार हे आरोपीं विरुध्द त्यांच्या अभियोग पक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात कोणतीही सुचना मान्य केलेली नाही.

**१०.** याकामी उपलब्ध पुराव्यावरुन असे निदर्शनास येते की, यातील फिर्यादी व आरोपींमध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. अभियोग पक्षातर्फे कोणताही जप्ती पंचनामा अभिलेखावर आहे, तसेच

आरोपींतर्फे मान्य केलेला घटनास्थळ पंचनामा अभियोग पक्षाचे केसला कोणतेही समर्थन देत नाही. अशा परिस्थीतीत आरोपींवरील गुन्हा अभियोगपक्षाला सर्व शंकांच्या पलीकडे जावून सिध्द करता आलेला नाही. तसेच अभियोगपक्षातर्फे फिर्यादीने घटनेच्या फिर्याद प्रमाणे सुसंगत असे कथन तिच्या तोंडी पुराव्यात केले नाही. त्यामुळे अभियोग पक्षातर्फे दाखल असलेले दस्तऐवज घटनास्थळ आणि जप्ती पंचनामा हा अभियोग पक्षाचे केसला समर्थन देत नाही. अशा परीस्थितीमध्ये आरोपींनी समान उद्देशाने फिर्यादीच्या घरामध्ये प्रवेश करुन व तिचा हात धरुन तिला ओढुन तिचा विनयभंग केला हे शाबीत होत नाही. तसेच फिर्यादीस व साक्षीदारास लाथाबुक्क्याने मारहाण करुन धाकदपटशा केला व जीवे मारण्याची धमकी दिली ही बाब देखील शाबीत होत नाही. तसेच त्यामुळे आरोपींवरील दोषारोप कलम ३५४, ४५२, ३२३, ४२७, ५०४ व ५०६ सह कलम ३४ हे विनाशंका शाबीत होत नाहीत. त्यामुळे मुद्दा क्र.१ ते ६ चे उत्तर मी नकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र.७ साठी</u>:–**

**११.** वरील सर्व विवेचनांवरुन व कारणमिमांसेवरुन अभियोगपक्षाने विश्वासपात्र पुरावा नोंदवून आरोपी क्र.१ ते ४ यांचे विरुध्द गुन्हा संशयापलीकडे जावून सिध्द केलेला नाही. त्यामुळे आरोपी क्र.१ ते ४ हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. सबब, मुद्दा क्र. ७ च्या उत्तरादाखल मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

:: **आदेश** ::

| | |
|---|---|
| १. | आरोपी क्र. १ ते ४ यांना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम |

| | |
|---|---|
| | २४८(१) अन्वये भारतीय दंड संहिता कलम ३५४, ४५२, ३२३, ४२७, ५०४ व ५०६ सह कलम ३४ या गुन्ह्यातून निर्दोष मुक्त करण्यात येते. |
| २. | आरोपींचे जात मुचलके व जामीन रद्द करण्यात येतात. |
| ३. | आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७ (अ) अन्वये प्रत्येकी रुपये १५,०००/- चे जामीन बंधपत्र करुन द्यावे. |
| | (न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर) |

KESHAV KRISHNA KHOMANE

Digitally signed by KESHAV KRISHNA KHOMANE
Date: 2026.04.10 13:16:52 +0530

( **के.के.खोमणे** )
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.१), आष्टी

ठिकाण – आष्टी
दिनांक – १०/०४/२०२६

**CERTIFICATE**

"I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Judgment / order"

Dictated on : 10/04/2026
Transcribed on : 10/04/2026
Checked & signed on : 10/04/2026

**Sd/-**
Anant S. Deshmukh,
(Stenographer Grade-III)